# वाणगांव एज्युकेशन सोसायटीचे

# जगमोहन महादेवसिंह ठाकूर हायस्कूल

## वाणगांव, ता. डहाणू.

**इतिहास-**

स्वातंत्र्यपूर्व काळात वाणगांवची व्याप्ती फारच लहान होती. गावाच्या उत्तरेस खाडी आणि खाजण, दक्षिणेस गवताळ जमीन, पुर्वैस आदिवासी व वनक्षेत्र खाडी व अविकासित भाग असे हे वाणगांव एखाद्या बेटाप्रमाणे बसलेले होते. गावाच्या प्रमुख वस्तीपासून थेडया थोडया अंतरावर पाटीपाडा, कोंबपाडा, पाटेपाडा, बाकीपाडा, केतखाडीपाडा, स्टेशनपाडा अशा लहान-लहान आदिवासी पाडयांनी (वाडया) वेढलेले होत. त्यावेळीच्या खानेसुमारीप्रमाणे साधारण सातशे-आठशे लोकवस्ती असावी. वाणगांव गावाला तसा इतिहास नाही. जे आजचे पगत रूप दिसत आहे ते गेल्या काही वार्षातील आहे. या भागातील मुळवस्ती ही सत्तर टक्के आदिवासीची व बाकीची मध्यम वर्गीयांची. रेल्वे येण्यापूर्वी हा भाग तसा दुर्लक्षितच होता. परंतु शंभर सव्वाशे वर्षापूर्वी रेल्वे आल्यामुळे बाहेरुन काही उत्तर प्रदेशीय त्याचप्रमाणे गुजराथी, जैनसमाज मंडळी येथे कामाधंद्यानिमित्त येऊन स्थायिक झाली. त्यावेळेला चिंचणी ही बाजारपेठ असल्यामुळे त्यापैकी व्यापारी मंडळी चिंचणी येथे स्थायिक राहून व्यापारधंद्यापुरतीच वाणगांव येथे ये-जा करीत होती. त्यांच्या बऱ्याचश्या मालकीच्या जमिनी या भागातच होत्या. मलेरिया व इतर साथी नेहमी पडत असल्यामुळे ही मंडळी चिंचणी येथे राहत होती. त्यामुळे वाणगांव हे वनगांव समजले जात होते. त्यावेळी वाणगांव येथे जैन समाजाची किराणा मालाची सात-आठ दुकाने व एकदोन लहानशी हॉटेल्स एवढीच मर्यादित बाजारपेठ होती. या ठिकाणी प्रामुख्याने शेती व गवताचा धंदा होता. परंतु उत्तर प्रदेशीय मंडळी येथे आल्यानंतर गवताच्या धंद्यास महत्त्व प्राप्त झाले. अशा या गावामध्ये वाणगाव-चिंचणी हा वाहतुकिसाठी कच्चा रस्ता होता. त्यावरून टांगे व खाजगी प्रवासी वाहने धावत होती. दिवसातून मोजक्याच रेल्वेच्या एक-दोन पॅसेंजर गाडया ये-जा करीत होत्या. संध्याकाळी सात वाजेनंतर सर्वत्र सामसून असायची. अशावेळी एकटया-दुकटया माणसाला बाहेर फिरणे कठीण जात होते. एकंदरीत लोकांचे जीवन अंधारमय, दिशाहीन, भरकटलेले असे होते. अशावेळी नियतीने लोकांना नवा प्रकाश, नवी दिशा दाखविण्यासाठी, वाणगावचा कायापालट करण्यासाठी, भीतीचे वातावरण नाहीसे करण्यासाठी श्री. वैजनाथ शेठ कुटुंबियांची नियुक्ती केली असावी असे समजण्यास काही हरकत नाही.

श्री. ठाकूर कुटुंब हे उत्तर प्रदेशातील रायबरेली या गावातून नोकरी धंद्यानिमित्त वाणगांव येथे आले व स्थायिक झाले. थोडयाच अवधीत स्वकष्टाने व शोधक दृष्टीने गवत धंद्याचे सारे ज्ञान आत्मासात केले व गवत धंद्यात चांगलाच जम बसविला. सदरहू धंदा करीत असताना त्यांना अनेक अडचणी व आपत्तींना तोंड द्यावे लागले. त्यावर मात करून त्यानी स्थावर मिळकत घेउन सन १९४२ साली एक लहानसा कौलाक बंगला बांधला आणि ते झोपडीत बंगल्यात राहण्यास आले. त्यावेळेपासूनच वाणगावच्या विकासाला चालना मिळाली. स्वतःचा विकास होत असताना वाणगावचाही विकास व्हावा ही दूरदृष्टी ठेवली व वाणगांवच्या एका नव्या 'दानशूर बैजनाथ शेठ' युगास प्रारंभ झाला.

प्रथम त्यांनी मानव सेवा संघाची स्थापना केली आणि आदिवासी पाडयावर विहीरी बांधून पिण्याच्या पाण्याची सोय करून दिली. ग्रामस्थ्यांच्या सहकार्याने सामाजिक सुरूवात केली. त्यामुळे गावामध्ये नवचैतन्य, नवा उत्साह, लोकांमध्ये आत्मविश्वास, निर्भयता निर्माण झाली. दहशतवादाचा व गुंडागिरीचा निःपात केला. अशा रीतीने नव्या वाटचालीचे वातावरण निर्माण केले.

त्याचवेळी वाणगांमध्ये मराठी शाळेत चौथीपर्यतच शिक्षणाची सोय होती. श्री.नटवरलाल नाई यांच्या सलून असलेल्या घरात शाळा भरत होती. प्रारंभी पाचवी, सहावी, सातवीच्या शिक्षणाची सोय येथून आठ-दहा किलोमीटर दूर असलेल्या चिंचणी व डहाणू येथे होती व इंग्रजी शिक्षणाची तेथेच सोय होती.त्यामुळे फक्त श्रीमंतांची मुले विद्यार्जनासाठी शहरात पाठविली जात असत तर काही मुले आपल्या नातलगांकडे राहून विद्यार्जन करीत होती. अशावेळी श्री. गोपाळ गुरूजी (राऊत) यांची मुख्याध्यापक म्हणून वाणगांव प्राथमिक शाळेत नेमणूक झाली. त्यानी पाचवी-सहावीचा वर्ग करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. त्यामुळे पुर्वीच्या शाळेची खोली अपूरी पडू लागली. अशावेळी ही होणारी अडचण श्री. गोपाळ गुरूजीनी श्री. बैजनााथशेठ ठाकुर आणि बंधु योच्या कानावर घातली. श्री. बैजनाथशेठ ठाकूर आणि बंधुनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ श्री. महादेवसिंह ठाकूर प्राथमिक शाळेची सहा खोल्यांची इमारत केवळ एका वर्षाच्या आत बांधून दिली व जिल्हर लोकल बोर्डाकडे सूपुर्द केली. त्या इमारतीचे उद्घाटन तत्कालीन मुंबई राज्याचे स्थानिक स्वराज्य मंत्री ना. श्री. गोविदराव धर्माजी उर्फ अण्णासाहेब वर्तक यांच्या शभहस्ते झाले. त्याचवेळी ग्रामीण भागातील आदिवासी व मध्यम वर्गातील लोकांच्या आरोग्याची सोय व्हावी म्हणुन दवाखान्याची इमारत स्वखर्चाने बांधून दिली. त्या वेळेपासून बैजनाथ शेठची 'दानशूर बैजनाथ शेठ' म्हणूप सा-या जिल्हयात किर्ती पसरली. त्याचवेळी वाणगांवचे उगवते तारे श्रह. सत्येद्रभाई ठाकूर व श्री. राजेन्द्रभाई ठाकूर हे बोर्डी येथील पू. आचार्य भिसेंच्या अधिपत्याखालील माध्यमिक शाळेत शिक्षण घेत होते. अशाप्रकारे एका बाजुला बैजनाथ शेठ कुटुंबाचा विकास होत असताना वाणगावचाही विकास होत होता. अशाच वेळेला सातवी पर्यतच्या शिक्षणाची सोय झाल्यावर पुढे माध्यमिक शिक्षणाची अडचण भासू लागली. त्यामूळे कित्येक हुशार व होतकरू मुले केवळ शिक्षााची सोय नसल्यामुळे शिक्षाणापासून वंचित राहिली. हि अडचण तयावेळचे दवाखान्याचे डह्क्टर श्री. कृष्णाजी अनंत जोशी यांच्या नजरेतुन सुटली नाही. डह्. जोशी यानी ज्या ज्या ठिकाणी त्यांची नेमणुक झाली. होती त्या तया ठिकाणी शिक्षण संस्था निर्माण केल्या होत्या चाणगांवमधील ही परिस्थिती बघत असताना ते कसे शांत राहतील ? हा भाग शैक्षणिक दृष्टया मागासलेला राहु नये म्हणून त्यांनी ही गोष्ट गावातील एक प्रतिष्ठित, शिक्षणप्रेमी नागरिक श्री. विनायकराव भट यांच्या निदर्शनरस आणली. त्याच सुमाारास डहाणू येथील पोंदा हायस्कूलचे प्रिन्सिपाल श्री. आपटे सर यानी विद्यार्थ्याची ट्रिप वाणगांव येथे आयोजित केली होती. हा एक चांगला योगायोग होता. त्या बाबतीत डह्. जोशी व श्री. विनायक भट यांनी त्यांव्याबरोबर चर्चा केली व मार्गदर्शन करण्याची विनंती केली. त्यावेळी त्यानी त्यांच्या निदर्शनास आणून दिले की, शैक्षणिक संस्था काढण्यासाठी पैसा लागतो, पैशाचे बळ, कष्ट व जिद्द असली तर शैक्षणिक संस्था चालविता येतात. तुमच्याकडे योगायोगाने श्री. बैजनाथ शेठ व त्यांचे बंधू श्री. मोहन शेठ, श्री. जगमोहन शेठ अशी दानशूर मंडळी असताना तो प्रश्न सहज सुटण्यसारखा आहे.

त्यानंतर ही सर्व मंडळी ठाकूर बंधुकडे गेली आणि त्यांच्या कानावर ही गोष्ट घातली. आपण जर आर्थिक मदत केली तर या भागातील माध्यमिक शिक्षणाचा प्रश्न सुटेल. अशावेळेला श्री. बैजनाथ शेठ आणि बंधू यानी त्यांना तात्काळ होकार दिला. पैशांची चिंता करू नका कामाला लागा ! ताबडतोब ता. १६-४-५६ रोजी वाणगांव येथे श्री. बैजनाथ शेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. व खालील पदाधिका-यांची निवड करण्यात आली. -अध्यक्ष :- श्री. बैजनाथ शेठ ठाकूर, उपाध्यक्ष :- श्री. रामचंद्र गणपत कोरे सेक्रेटरी : - श्री. विनायक कृष्णा भट, दुरूय्यम सेक्रेटरी : - श्री पद्माकर दाजी पाटील आणि त्याप्रमाणे समितीने शासनाकडे ८वी चा वर्ग सुरू करण्यासाठी परचानगी मागणीसाठी दि. २४-४-५६ रोजी रीतसर अर्ज केला. श्री. बैजनाथ शेठ ठाकूर यांनी त्यावेळेचे उपमंत्री महोदय शामरावजी पाटील यांची भेट घेऊन व आपले वनज खार्च करून मान्यता मिळविली. त्यानंतर दि. ८ जून १९५६ रोजी शाळेचा ८वी चा प्रथम वर्ग श्री. विनायकराव भट यांच्या माडीचर भरविण्यात आला. त्यावेळी के. एल. पोंदा हायस्कूचे प्रिन्सिपल श्री. गो. द. आपटे सर यानी आपल्या भाषणात रौप्यमहात्सवी शाळेचे स्वप्न रंगविले आणि आज खरोखरच त्यांवे ते स्वप्न प्रत्यक्षात साकार झालेले आहे त्यानंतर जुलै १९५६ म्हणजे एक महिन्याच्या कालावधीत जिल्हयाहून शिक्षण अधिकारी वर्ग पाहणी करण्यासाठी दाखल झाला परंतु क्यावेळी काही गोष्टीची पूर्तता झाली नसल्याने विशेषतः माडीवरील वर्गात जाण्यासाठी श्री. भट यांच्या

घरातूनच जाण्या-येण्याचा जिना (मार्ग) असल्याने आणि खोलीचह उंची कमी असल्याने तो वर्ग त्या ठिकाणाहून हलवाचा म्हणून आग्रह केला. त्यानेतर गुन्हा जागेचा प्रश्न निर्माण झाला. त्यावर पुन्हा कमिटीची चर्चा होऊन वडदे येथील श्री. मोरेश्वर जगन्नाथ पाटीज यांची चाणगांव येथील जागा ८ वी च्या वर्गासाठी पसंत करून मागण्यात आली. श्री मोरेश्वर पाटील यानी स्वखूशीने तावडतोब जागा देण्याचे मान्य केले आणि त्यांच्या धरात ( आता पोलिस स्टेशन असलेल्या ) वर्ग हलविण्यात आला. पुढे त्याच वेळैला शासनाकडून आपली जागा योग्य नाही तसेच वर्गाला फर्नीचर, बाके, कपाटे इ.सामान नाही म्हणून वर्ग ताबडतोब बंद करावा असा टेलिग्रॅम आला. त्यावेळी श्री. बैजनाथ शेठ ठाकुर व त्यांचे सहकारी ताबडतोब शासनाच्या शिक्षणखात्याकडे गेले व त्याची पूर्तता आम्ही ताबडतोब करतो आमच्या शाळेची मान्यता रद्द करू नये अशी विनंती केली. त्यानंतर ताबडतोब सप्टेंबर १९५९ महिन्यात शाळा श्री. बैजनाथ शेठ यांच्या बंगल्यात हलविण्यात आली ( संध्या ठाणे जिल्हा बॅक असलेली जागा) व त्यानी स्वखर्चाने सर्व  फर्निचर, कपाटे आदिची पुर्तता केली आणि तपासणी होउन शाळेला ताबडतोब मान्यता देण्यात आली.

आठवीच्या वार्गास सुरूवात करण्याचे ज्यावेळेस ठरविले त्यावेळी प्रथम दोन महिने म्हणजे ट्रेंड शिक्षक ताबडतोब न मिळाल्याने श्री. रघुनाथ रा. सावे यांची तात्पुरते मुख्याध्यापक म्हणुन अल्प मानधनावर नेमणुक करण्यात आली. आणि त्यावेळी वर्गाल दीड शिक्षक लागत असल्यामुळे श्री. बी ए.च. अंभिरे यांनी अर्धवेळ शिक्षकाचे काम विनावेतन करण्याचे मान्य केल्याने वर्ग सुरळीत चालु झाला. त्यानंतर दोन महिन्यांनी चिंचणी हायस्कूलचे निवृत्त पदवीधर शिक्षक श्री. गोवर्धनदास शहा यांची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक केली. त्यांनी अल्प वेतनावर मख्याध्यापक म्हणून काम पाहिले. ८वी च्या वर्गास गणित व आरोग्य विषयाचा अभ्यासग्रम अनुक्रमे श्री. विनायकराव भट व श्री कृष्णाजी जोशी यानी नियमित शाळेत येऊन सेवावृत्तीने पार पाडला.शिपाई म्हणून श्री. मुरलीधर भट यांची नेमणूक करण्यात आली. अशा रितीनें ८वी च्या वर्गाची परीक्षा होऊन नववीचा वर्गा सुरू झाला. आणि नवीन समस्या निर्माण झाली. आठवीचे विद्यार्थी नववीत गेल्याने पुन्हा ८वी च्या वर्गासाठी विद्यार्थी अपूरे पडऊ लागले. त्यामुळे वसतीगृहाची कल्पना निघाली व त्या दृष्टीने समितीने प्रयत्न चालू केले.वाणगांव, आसनगांव परिसरातील काही विद्यार्थी शिक्षासाठी बाहेरगावी गेले होते. त्यांच्या पालकांना समक्ष भेटून त्याना आपल्या शाळेत शिक्षणासाठी पाठविण्याची विनंती केली. त्यावेळी अनेक पालकांनी संस्थेच्याा शाळेत विद्यार्थी पाठविण्याचे मान्य केले. तरीही भविष्य काळात संस्थेत विद्यार्थी कमी पडतील म्हणून आदिवासी वसतीगृह काढण्याचा निर्णय घेतला आणि समिती कामाला लागली. खेडयापाडयात जाऊन आदिवासी पाकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले व त्यानी त्यांच्या मुलांना आदिवासी वसतीगृहात पाठविण्याचे मान्य केले. त्यानंतर श्री. बैजनाथ शेठ यांनी स्वखर्चाने आदिवासी वसतीगृह स्वतःच्या आवारात चालू केले. ती जागा सोयीच्या दृष्टीने अपूरी पडल्यामुळे भोजनालयाची सोय श्री. सखाराम गणेश भट यांचे जागेत करण्यात आली. अशाप्रकारे हायस्कुल आणि आदिवासी वसतीगृह नियमानुसार सुरळीत चालू झाले. या दोन्ही संस्थांना स्थिरता देण्याच्या दृष्टीकोनातून कायम स्वरूपाची जागा पाहण्यास समितीने सुरूवात केली. संस्थेच्या सुदैवाने वाणगांवच्या मध्यभागी श्री. हर्षबहादुर चौव्हाण यांची जागा संस्थेच्या निदर्शनास आली. त्यावेळेला ही जागा त्यांच्याकडुन संस्थेला देणगी म्हणून मिळविण्याचे काम त्यावेळचे संस्थेचे उपाध्यक्ष श्री. रामचंद्र गणपत कोरे यांचेकडे समितीने सोपविले व त्यांनी कुशलतेने श्री. हर्षबहादुर चौव्हाण यांना विनंती करून संस्थेला जागा मिळवुन दिली. त्याचवेळी संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन जोरात सुरू होते. सुदैवाने व योगायोगाने १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्य स्थापनेची घोषणा झाली. या संधीचा लाभ घेऊन दि. १ मे १९६० रोल श्री. हर्षबहादुर यांनी देणगी दिलेल्या जागेत समितीने महापुजा आयोजित केली व परिसरातील सांस्कृतिक कार्यक्रम ठेवला. सदर महापूजा श्री. मुरलीवर श्री .धर भट (बाबूकाका) व सौ. शकुतला भ्झट यांच्या शुभहस्ते पार पडली. अशारितीने त्या जागेचा ताबा व शांतीहोम करून देण्यात आला. लवकरच त्या जागेतील भिंतीच्या गोडाऊनमध्ये पत्र्यांचे पार्टेशन घालून वर्ग बसविण्यात आले आणि श्री. बैजनाथ शेठ ठाकूर यांच्या आवारातील शाळा संस्थेच्या स्वतःच्या वास्तुमध्ये येऊन दाखल झाली. आणि श्री. रामचंद्र कोरे यांच्या हस्ते नवीन इमारतीचा भूमीपूजन समारंभ पार पडला. १९६१ सालामध्ये श्री. बैजनाथ शेठ आणि कुटुंबियांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने भरघोस देणगी

देऊन पश्चिमेकडील दोन खोल्या ताबडतोब बांधून दिल्या. त्या पाठोपाठ प्रार्थनाहॉल. उत्तरेकडच्या दोन खोल्या सन १९६२ पर्यंत त्यानी स्वखर्चाने बांधून दिल्या. त्यावेळेस श्री. हरजीवन वसनजी ट्रस्ट व प्रमुख ग्रामस्थानी उदार हस्ते देणग्या देऊन संस्थेस बहूमोल सहकार्य केले आणि अशाप्रकारे १९६२-६३ साली एस. एस. सी. च्या पहिल्या वर्गाला निरोपे देण्याचा समारंभ श्री. गो. द. आपटे सर चांच्या हस्ते करण्यात आला. संस्थेला अभिमानाची गोष्ट म्हणजे एस. एस. सी परिक्षेचा निकाल ५६ टक्के लागून प्रथम क्रमांक कु. मिनाक्षी मंगळदास शहा ही ७१ टक्के गुण मिळवून प्रथम आली. त्यानंतर गावामध्ये आनंदमय वातावरण निर्माण झाले व ग्रामस्थाना स्वप्नपूर्तीचा आनंद झाला. हा आनंदसोहळा चालू असतानाच श्री. बैजनाथ शेठ आणि बंधुनी त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ आदिवासी वसतीगृहाच्या पायाभरणीच्या कामास सुरूवात केली. शंभर मुलांची सोय व्हावी या दृष्टीने सर्व सुख-सोयीने युक्त अशी आदिवासी वसतीगृहाची इमारत उभारली. १९६५ साली तिचे उद्घाटन त्यावेळेचे आमदार श्री. म. गो. कडू यांच्या हस्ते करण्यात आले. सहरहू वसतीगृहामध्ये जव्हार, डहाणू, तलासरी, पालघर व इतर जिल्हयातील विद्यार्थीही शिक्षणासाठी दाखल झाले. त्यातील काही आदिवासी विद्यार्थी डॉक्टर पदवीधर झालेले आहेत.

सन १९६३ साली संस्थेचे कार्याध्यक्ष म्हणून श्री. सत्येन्द्रनाथ ठाकूर यांची निवड झाली व संस्थेचे नेतृत्व तरूणवर्गाकडे आले. श्री. सत्येन्द्रभाई यांचेकडे नेतृत्व आल्यानंतर एका बाजुला संस्थेचा पसारा वाढत चाललेला होता आणि दुसऱ्या बाजूला विद्यार्थी संख्याही वाढत होती. अशा वेळी पुन्हा वर्ग खोल्यांची अडचण भासू लागली तसेच फर्निचरचीही कमतरता जाणवली. त्यावेळेला योगायोगाने १९६२ साली डहाणू पंचायत समितीचे सभापती म्हणून त्यांची अविरोध निवड झाली होती. त्यामूळे संस्थेच्या कामाला अधिक चालना मिळून संस्था भरभराटीस आली. त्यानंतर संस्थेसाठी देणग्या गोळा करण्याकरिता खालील सभासदांची उपसमिती नेमण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सत्येन्द्रभाई ठाकूर | कार्याध्यक्ष |
| २. | श्री. मदनभाई मेहता | उप कार्याध्यक्ष |
| ३. | श्री. चन्दुलाल नानाभाई शहा | उप कार्याध्यक्ष |
| ४. | श्री. वि. कृ. भट | उप कार्याध्यक्ष |
| ५. | श्री. बी. व्ही. भट | उप कार्याध्यक्ष |

त्यावेळेस चिटणीस म्हणून श्री. बाबासाहेब केळकर यानी काम पाहण्याचे मान्य केले. त्यानंतर देणगीच्या रकमेतून व इमारतीस जादा येणारा खर्च श्री. सत्येन्द्रभाई ठाकूर यानी देणगी म्हणून देण्याचे ठरविले. याप्रमाणे संस्थेच्या वर्गखोल्या बांधून तयार करण्यात आल्या. अशारितीने संस्थेला आवश्यक असलेल्या सर्व सोयीने युक्त अशी इमारत बांधून त्यानी सर्वांच्या सहकार्याने पूर्ण केली. हे सर्व करीत असताना शाळेचे व संस्थेचे काम सुरळीत व शिस्तबध्द रितीने तसेच घटनेचेही काम त्यावेळचे सेक्रेटरी श्री. बैजनाथ शेठ ठाकूर आणि बंधुकडून आजपर्यंत सुमारे रूपये एक लाखाचे वर देणगी रूपाने मिळतले होते त्यात आणखी रूप्ये पन्नास हजाराची रक्कम देणगी म्हणून स्विकारून शाळेला ‘ जगमोहन महादेवसिंह ठाकूर विद्यालये‘ असे नाव देण्यात यावे असे दि. ५.०४.१९७० रोजी झालेल्या कार्यकारणीच्या सभेमध्ये सर्वानुमते ठरविले. त्यानंतर ‘ विद्यामंदिर‘ ऐवजी ‘जे. एम. टी. हायस्कूल‘ म्हणून संस्थेच्या हायस्कूलच्या इमारतीस नाव देण्यात आले. घटनेत व सरकार दरबारी कागदोपत्री त्याप्रमाणे नोंद करण्यात आली. श्री. जगमोहन शेठ ठाकूर व श्री. सत्येन्द्रभाई ठाकूर यानी स्वतः उभे राहून समोरच्या ग्राउंड फ्लोअरचे बांधकाम सहा महिन्याच्या आत पूर्ण करून दिले. त्या इमारतीस जवळ जवळ रू. एक लाख खर्च झाला. अशारितीने शाळेची परिपर्णता झाली. परंतु दुर्दैवाने १९७४ साली श्री. सत्येन्द्रभाई ठाकूर यांचे

दुःखद निधन झाले. त्यानंतर लागोपाठ श्री. बैजनाथ शेठ ठाकूर, श्री. जगमोहन शेठ ठाकूर व मोहनसिंह ठाकूर या तिन्ही दानशूर बंधूंचे निधन झाले आणि संस्थेची सूत्रे सन १९७५ साली श्री. प्रतापभाई ठाकूर यांच्याकडे आली. श्री. प्रतापभाई ठाकूर यानी सूत्रे हाती घेतल्यानंतर संस्थेचा व्याप वाढत चालला. पुन्हा वर्गांची कमतरता भासू लागली आणि ताबडतोब समोरच्या इमारतीवर वाढीव इमारत बांधण्याचे काम सुरू झाले. ही इमारत बांधण्यासाठी डहाणू पंचायत समितीने रूपये एक लाखाचे अनुदान दिले. श्री. हरजीवन वसनजी ट्रस्टने रूपये चाळीस हजार तसेच ग्रास असोशिअेशनने उदारहस्ते भरघोस मदत केली. दानशूर ग्रामस्थांनी देणग्या दिल्या. अशारितीने रूपये पाच लाखाची इमारत संस्थेने उभारली. ही इमारत बांधण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. हरिलाल कंसारा व संस्थेचे सेक्रेटरी श्री. मुकुंदराव चौव्हाण यानी अहोरात्र मेहनत घेऊन ती वेळीच पूर्ण केली. श्री. प्रतापभाई ठाकूर यानी आपल्या हातात सूत्रे घेतली त्यावेळी हायस्कूलमध्ये ३०० विद्यार्थी होते व आज जवळ जवळ ८०० विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. शासनाच्या धोरणाप्रमाणे वर्गाच्या तुकडीस मान्यता मिळवणे कठीण झाले आहे. परंतु यासाठी लिल्हयाचे नेते श्री. ठाकोरभाई शाह यानी निधी मिळविणापासून ते वर्ग तुकडीस शासनाकडुन मान्यता मिळविण्यापर्यंत बहुमोल सहकार्य केले. त्याबद्दल संस्था सदैव त्यांची ऋणी आहे. माजी आमदार श्री. म. गो. कडू, आजी आमदार श्री. शंकरराव नम तसेच सभापती श्री. धर्माभाऊ पऱ्हाड, जिल्हा परिषद सदस्य श्री. एम. एम. राऊत यांचे श्रेय संस्थेत नेहमी मिळत आहे. त्यांचीही संस्था आभारी आहे.

आज वाणगांव एज्युकेशन सोसायटीचे ‘ जे. एम. टी. हायस्कूल ’ आणि अदिवासी वसतीगृह’ या दोन्ही संस्था जिल्हयामध्ये नावाजलेल्या आदर्श संस्था म्हणून ओळखल्या जात आहेत. आज संस्थेमध्ये ७४० विद्यार्थी, व आदिवासी वसतीगृहामध्ये ८० विद्यार्थी असून संस्थेकडे सर्व पदवीधर शिक्षक-शिक्षिका आहेत. संस्थेची अत्याधुनिक रसायनशास्त्र प्रयोगशाळा, ग्रंथालय, ड्रॉईंग हॉल, सांस्कृतिक हॉल आहे. अशारितीने सर्व गोष्टींनी परिपूर्ण असून शालान्त परीक्षेचा निकाल या तालुक्यामध्ये गेल्या दहा वर्षापासून वाढलेला आहे. जिल्हयातील ज्या नावाजलेल्या संस्था आहेत त्यामध्ये ही संस्था अग्रेसर आहे, याचा आम्हास अभिमान वाटतो !